**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**
**(सकाळ)**

जा.क्र. ४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०१/२०१७

**१) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०१/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही आपल्या मैत्रीनी सोबत शाळेत जातो म्हणुन घरुन गेली असता शाळेचे गेट समोरुन निघुन गेल्याने व ती घरी परत न आल्याने तिचे आजुबाजुला व रिस्तेदारीत शोध घेतला असता मिळुन आली नाही फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन व महाराष्ट्र शासनाचे परीपत्रक सीआरटी ०९१२ प्र. क. ५४— पोल —१३ दि. १०/०४/१४१३ चे परीपत्रका अन्वये पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) बिना पास परवाना अवैद्यरित्या ६ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १७/०१/२०१७ चे १८.४० वा. दर. यातील फिर्यादी सुखदेव खुशालराव वासनीक वय ५४ वर्ष, तहसीलदार तहसील कार्यालय पवनी त्यांचे पथकातील स्टॉपसह अवैद्य रेती वाहतुक करणारे ट्रकांवर कार्यवाही करण्यास चेकींग सुरु असतांनी यातील आरोपी ट्रक चालक व मालक तसेच अज्ञात ट्रक चालक आरोपी यांनी आपआपल्या ट्रक मध्ये प्रत्येकी ६ ब्रास रेती एकुण कि. २४,०००/—रु. ची चोरीने भरुन वाहतुक परवाना न बाळगता मिळुन आल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) जुन्या वादावरुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/०१/२०१७ चे १६.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी हजर असतांना यातील आरोपी हा दारु पिवुन आला आणी फिर्यादी व तिची आई यांना अंगनात पाहुन तिचे जुने तक्रारीचे वादावरुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन फिर्यादीचे आईचे डोक्याचे केस पकडुन हलवीले व पाठीवर थापडांनी मारुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक १७/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, पवनी व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी दारु दारु कि. ५००/—रु. तसेच १ लि २६० मिली लीटर देशी दारु कि. ३५०/—रु. असा एकुण कि. ८५० /—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**(बी. आर. गाडे)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

PSC

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.